महा न्यूज & व्ह्यूज

कामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# दिवाणबहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे दशपैलू व्यक्तीमत्व : ज्येष्ठ संशोधक डॉ.जयसिंगराव पवार

**कोल्हापूर ( महान्यूज अँड व्ह्यूज):**

कोल्हापूर, दि. १५ मे – शिवाजी विद्यापीठ आणि लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृह येथे दिवाणबहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेचा शुभारंभ बुधवार दि. १४ मे रोजी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या व्याख्यानाने झाला.

या व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा. खा. श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, कोल्हापूर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के तसेच प्र–कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. शांतिनाथ कांते, व्हाईस चेअरमन श्री. चंद्रकांत पाटील, मानद सचिव श्री. सुहास पाटील, लठ्ठे फौंऊंडेशनचे विश्वस्त डॉ. भरत लठ्ठे, व संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते व ज्येष्ठ इतिहास संशोधक प्रा. डॉ. जयसिंगराव पवार यांनी ''सत्यशोधक आण्णासाहेब लठ्ठे'' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करून आण्णासाहेब लठ्ठेंच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू उलगडले. दिवाणबहाद्दूर आण्णासाहेब लठ्ठे यांचे व्यक्तीमत्व दशपैलू असून राजर्षी शाहू महाराज यांची कृती आणि विचार पुढे नेण्याचे काम त्यांनी केले आहे. आण्णासाहेब लठ्ठे यांच्या कार्याची ओळख करून देताना त्यांनी आण्णासाहेब लठ्ठे हे सत्यशोधक विचारवंत, ब्राम्हणेतर नेता, उत्तम व कार्यक्षम प्रशासक, अर्थतज्ञ, अर्थमंत्री, समाजसुधारक व धर्मसुधारक, पत्रकार, कायदेतज्ञ, शाहू चरित्रकार, करवीररत्न, दिवाणबहादूर, प्राध्यापक असे बहूआयामी व्यक्तीमत्व त्यांना लाभले होते. आण्णासाहेब लठ्ठे यांनी लिहिलेले शाहू महाराजांचे चरित्र नवसंशोधकांना एक साधनग्रंथ म्हणून मार्गदर्शक ठरेल असे उद्गार त्यांनी या प्रसंगी काढले. शाहू महाराजांनी कोल्हापूर मध्ये बोर्डींग व वस्तीगृहे स्थापन करण्यासाठी लोकांना उद्युक्त केले. शिक्षण हे सर्व सुधारणांची गुरूकिल्ली असल्याचा विचार त्यांनी मांडला. आण्णासाहेब लठ्ठे एक थोर




समाजशिक्षक होते. त्यांनी जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करून समाजातील सर्व घटकांना समान संधी व समान स्वातंत्र्य मिळावे यासाठी पुढाकार घेतला. सत्यशोधक समाज घडविण्याचा हा मूलभूत गाभा असल्याचा विचार त्यांनी समाजापुढे मांडला. सत्यशोधन म्हणजे समाजशिक्षण हा विचार आण्णासाहेब लठ्ठे यांनी मांडला. आपल्या मधील हीनत्वाची भावना बाजूला ठेवली पाहिजे, असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. खासदार श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांनी करवीर संस्थानातील आण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान तसेच त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि साहित्यिक क्षेत्रातील योगदान यावर त्यांनी प्रकाशझोत टाकला. शाहू महाराजांच्या तीन पिढयांशी आण्णासाहेब लठ्ठे यांचे घनिष्ट संबंध होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आण्णासाहेब लठ्ठे यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील मोलाच्या कामगिरीबद्दल उपस्थितांना माहिती दिली. २१ व्या शतकातील समाजाने आण्णासाहेब लठ्ठेंचे विचार पुढे नेण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. राजर्षी शाहू महाराज आणि आण्णासाहेब लठ्ठे या दोन व्यक्तीमत्वांमध्ये 'सत्यशोधक' हा समान विचार असल्याचे मत व्यक्त केले. आण्णासाहेब लठ्ठेंच्या कर्तृत्वावर लहान पुस्तिका प्रकाशित करावी हा विचार व्यक्त केला.

या व्याख्यानमालेच्या शुभारंभप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन श्री. शांतिनाथ कांते यांनी केले. लठ्ठे फौंऊंडेशनचे विश्वस्त डॉ. भरत लठ्ठे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना 'अमेरिकेतील वैचारिक गुलामगिरी भारतात येऊ घातली आहे' असे मत व्यक्त केले. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये प्लॅस्टिकचा कचरा, रासायनिक खतांचा बेसुमार वापर, भ्रष्टाचार या प्रमुख समस्या असून पुढील पिढी घडविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम जागृत करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरूवात छत्रपती शाहू महाराज व स्व. दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. या प्रसंगी लठ्ठे एज्युकेशन सोसायटीने प्रकाशित केलेला ''दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे : काळ आणि कर्तृत्व'' हा ग्रंथ देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आण्णासाहेब लठ्ठे यांनी १९२४ मध्ये लिहिलेल्या छ. शाहू महाराज यांच्यावरील इंग्रजी भाषेतील चरित्र ग्रंथाच्या पुनरावृत्तीच्या प्रकाशनाचा सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे आभार कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मानले. या कार्यक्रम प्रसंगी लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व प्रशासकीय सेवक मोठया संख्येने उपस्थित होते. या व्याख्यानमालेचे संयोजन लठ्ठे एज्युकेशन सोसायटी, सांगली व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने करणेत आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. हेमा माणगावे व प्रा. सौ. पद्मजा पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAY 2025
सकाळ



कोल्हापूर : 'देशभक्ती सप्ताह' अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागातील माजी सैनिकांचा सन्मान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

# विद्यापीठात माजी सैनिकांचा सन्मान

**कोल्हापूर :** 'देशभक्ती सप्ताह'अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या सुरक्षा विभागामध्ये कार्यरत असलेले संरक्षण दलातील ३७ माजी सैनिक आणि अधिकारी यांनी देशासाठी दिलेल्या सेवेबद्दल आणि योगदानाबद्दल विद्यापीठातर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते गौरव चिन्ह आणि राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र देऊन गौरविण्यात आले. मुख्य सुरक्षा अधिकारी शिवाजी शिंदे, अभ्यास मंडळाचे उपकुल सचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी सेवेतील अनुभव मांडले. कारगिल युद्धादरम्यान त्यांनी दिलेल्या सेवेबद्दल आणि केलेल्या कामगिरीबद्दल विशेषत्वाने उल्लेख केला. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी देशसेवा करणाऱ्या सर्व संरक्षण दलातील जवानांबद्दल आदराची भावना व्यक्त केली. देशसेवा, देशप्रेम, देशभक्ती या ध्येयाने ते आपली सेवा देशाला समर्पित करून देशाच्या नागरिकांचे संरक्षण करतात म्हणून आपण सर्वजण सुरक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी स्वागत केले. प्रा. प्रमोद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

16 MAY 2025 **तरुण भारत**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ३७ माजी सैनिकांचा सन्मान

## सुरक्षा रक्षक म्हणून शिवाजी विद्यापीठात कार्यरत कर्मचारी

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

देशभक्ती सप्ताह अंतर्गत शिवाजी विद्यापीठांमधील सुरक्षा रक्षक विभागात कार्यरत माजी सैनिक व अधिकाऱ्यांचा सन्मान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. गौरव चिन्ह आणि शाहू महाराजांचे चरित्र असे सत्काराचे स्वरूप होते. विद्यापीठाच्या सेवेत असणाऱ्या ३७ जणांना सन्मानित केले. सुरक्षा रक्षक अधिकारी शिवाजी शिंदे, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी आपले सेवेतील अनुभव सांगितले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, देशसेवा, देशप्रेम, देशभक्ती या ध्येयाने सैनिक आपली सेवा देशाला समर्पित करतात. देशाच्या नागरिकांचे संरक्षण करतात



**कोल्हापूर : देशभक्ती सप्ताह अंतर्गत शिवाजी विद्यापीठात कार्यरत सुरक्षा रक्षकांच्या सन्मानावेळी सुरक्षा रक्षकांसोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.**

म्हणून देशातले नागरिक सुखाने राहू शकतात. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक, डॉ. टी. एम. चौगले यांनी केले. आभार कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद पाटील यांनी केले. विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी विकास विभाग व सुरक्षा रक्षक विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAY 2025
पुण्यनगरी

# माजी सैनिकांचा शिवाजी विद्यापीठात सन्मान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात देशभक्ती सप्ताह साजरा केला जात आहे. विद्यापीठाच्या सिक्युरिटी विभागामध्ये कार्यरत असलेले संरक्षण दलातील माजी सैनिक व अधिकारी यांनी देशासाठी दिलेल्या सेवेबद्दल आणि योगदानाबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे सन्मान करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते गौरवचिन्ह आणि शाहू महाराजांचे चरित्र देऊन गौरव करण्यात आला. विद्यापीठाच्या सेवेत असणाऱ्या एकूण ३७ माजी संरक्षण दलातील सेवकांना सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी चीफ सिक्युरिटी ऑफिसर शिवाजी शिंदे, त्याचबरोबर बोर्ड ऑफ स्टडीचे उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी आपले सेवेतील अनुभव सर्वांसमोर मांडले. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी केले, तर आभार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रमोद पाटील यांनी केले.

16 MAY 2025
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णासाहेब लठ्ठे दशपैलू व्यक्तिमत्त्व

## डॉ. जयसिंगराव पवार : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान




कोल्हापूर : दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे लिखित छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील इंग्रजी भाषेतील चरित्र ग्रंथाच्या पुनरावृत्तीचे प्रकाशन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शेजारी डॉ. जयसिंगराव पवार, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १५ : 'दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे यांचे व्यक्तिमत्त्व दशपैलू असून, राजर्षी शाहू महाराज यांची कृती आणि विचार पुढे नेण्याचे काम त्यांनी केले', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ आणि लठ्ठे एज्युकेशन सोसायटी सांगलीतर्फे विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे स्मृती व्याख्यानमालेचा प्रारंभ बुधवारी खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. पवार यांनी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफले.

डॉ. पवार यांनी 'सत्यशोधक अण्णासाहेब लठ्ठे' या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करून अण्णासाहेब लठ्ठेंच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले. 'लठ्ठे यांनी लिहिलेले शाहू महाराजांचे चरित्र नवसंशोधकांना एक साधनग्रंथ म्हणून मार्गदर्शक ठरेल. ते एक थोर समाजशिक्षक होते. त्यांनी जातिभेद, अस्पृश्यता नष्ट करून समाजातील सर्व घटकांना समान संधी व समान स्वातंत्र्य मिळावे यासाठी पुढाकार घेतला. सत्यशोधक समाज घडविण्याचा हा मूलभूत गाभा असल्याचा विचार लठ्ठे यांनी समाजापुढे मांडला', असे डॉ. पवार यांनी सांगितले.

खासदार शाहू महाराज यांनी करवीर संस्थानातील अण्णासाहेब लठ्ठे यांचे योगदान तसेच त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक आणि साहित्यिक क्षेत्रांतील योगदान यावर प्रकाशझोत टाकला. 'लठ्ठे यांचे विचार पुढे नेण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या कर्तृत्वावर लहान पुस्तिका प्रकाशित करावी,' असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सुचविले.

यावेळी अण्णासाहेब लठ्ठे यांनी १९२४ मध्ये लिहिलेल्या छत्रपती शाहू महाराज यांच्यावरील इंग्रजी भाषेतील चरित्र ग्रंथाच्या पुनरावृत्तीचे प्रकाशन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. लठ्ठे एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शांतिनाथ कांते यांनी स्वागत केले. लठ्ठे फाउंडेशनचे विश्वस्त डॉ. भरत लठ्ठे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, चंद्रकांत पाटील, सुहास पाटील उपस्थित होते. प्रा. हेमा माणगावे, पद्मजा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAY 2025
सकाळ

# साहित्य हेच आत्म्याचे खरे प्रतिबिंब : गोपाल शर्मा

## विद्यापीठात विद्यार्थ्यांशी संवाद

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : 'विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अफाट प्रगती झालेली असली, तरी आज कोणतेही यंत्र माणसाच्या मनाचा थांग लावू शकलेले नाही. मानवी संवेदनशीलता, विचार, भावना आणि आत्म्याची ओळख हे फक्त साहित्यच करून देऊ शकते, म्हणून साहित्य हेच आत्म्याचे खरे प्रतिबिंब आहे', असे प्रतिपादन हिंदीतील ज्येष्ठ लेखक गोपाल शर्मा-सहर यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शर्मा म्हणाले, 'लेखन करणे ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती एक सामाजिक प्रक्रिया आहे. लेखकाचे लेखन कमी असले तरी त्यात अद्‌भुत विचारमंथन असले पाहिजे. कोणतीही रचना शंभर वर्षे टिकावी, एवढे तिचे मूल्य असावे.' त्यांनी साहित्याच्या दूरगामी परिणामांवर, लेखकाच्या जबाबदारीवर आणि कालातीत लेखनाच्या आवश्यकता यावर भर दिला.

यावेळी कादंबरीकार डॉ. बाळासाहेब लबडे, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. अक्षय भोसले, संतोष कोळेकर, सुवर्णा गावडे, सतीश हरपडे, आनंद बेडगे, हणमंत कांबळे, अजय कांबळे, जानकी देसाई, प्रमोद कांबळे, अनिकेत माने आदी उपस्थित होते. डॉ. प्रकाश मुंज यांनी सूत्रसंचालन केले. गीता दोडमणी यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 MAY 2025
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत १०४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च–एप्रिल २०२५ उन्हाळी सत्रातील झालेल्या १०४ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. तर गुरूवारी ८७ अभ्यासक्रमाच्या परीक्षा १६५ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. ४३ हजार २६३ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. यामध्ये बीए., बीएस्सी., बीसीए, बीआयडी, बीबीए, बीएड, बॅचलर ऑफ लॉ, एमबीए, एमए, हाय्यर डिप्लोमा इन रशियन लँग्वेज आदी विषयांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 MAY 2025 पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेला ४३,२६३ विद्यार्थी उपस्थित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ४३ हजार २६३ विद्यार्थी उपस्थित होते.

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सुरु आहेत. गुरुवारी बीए., बीएस्सी., बीसीए., बीआयडी., बीबीए. बीई., बॅचलर ऑफ लॉ, एमबीए. एमए., आदी ८७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने विविध १६५ केंद्रावर पार पडल्या. १५ रोजी बीएस्सी. (फूड टेक्नॉलॉजी), बायोटेक्नॉलॉजी, बीएस्सी. आदी अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले आहेत.